**जोडपत्र १**

**महापरिपत्रक**

**कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) व स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर)**

**सीआरआरसाठी डिमांड व टाईम लायाबिलिटीज काढणे**

**(अनुसूचित प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना लागु)**

**[परिच्छेद ३.७(२) अन्वये]**

**(१) निरनिराळ्या संज्ञांच्या व्याख्या**

(बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ५६ सह वाचित कलम १८(१) च्या स्पष्टीकरणानुसार)

(१) सरासरी दैनिक शिल्लक - म्हणजे, एखाद्या पंधरवड्याच्या प्रत्येक दिवशी, व्यवहार समाप्त होतेवेळी असलेल्या शिल्लकांची सरासरी.

(२) पंधरवडा म्हणजे शनिवार ते पुढील दुसरा शुक्रवारपर्यंतचा (दोन्हीही दिवस धरुन) कालावधी

**(२) बँकिंग सिस्टिम मध्ये पुढील बाबी येतात**

(१) भारतीय स्टेट बँक

(२) भारतीय स्टेट बँकेच्या दुय्यम बँका

(३) राष्ट्रीयीकृत बँका

(४) प्रादेशिक ग्रामीण बँका

(५) बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ च्या कलम ५ च्या खंड (क) मध्ये व्याख्या केलेल्या बँकिंग कंपन्या, ह्यामध्ये पुढील समाविष्ट आहेत

* खाजगी क्षेत्रातील बँका
* विदेशी बँका,

**[टीप** - भारतात कोणतीही शाखा नसलेल्या विदेशी बँका ह्या बँकिंग सिस्टिम चा कोणताही भाग नाहीत ]

**[टीप** - सहकारी भू-तारण/विकास बँका ह्या बँकिंग सिस्टिम चा भाग नाहीत. **]**

(६) ह्याबाबत केंद्र सरकारने अधिसूचित केलेली इतर कोणतीही वित्त संस्था.

बँकिंग सिस्टिम मध्ये पुढील संस्था समाविष्ट नाहीत :

(१) एक्झिम बँक

(२) नाबार्ड

(३) एसआयडीबीआय

(४) आयएफसीआय

(५) आयआयबीआय

**(३) जबाबदा-या (लायाबिलिटीज) मध्ये पुढील बाबी समाविष्ट नाहीत**

(१) भरणा झालेले भांडवल

(२) राखीव निधी

(३) नफा व तोटा लेखेमधील क्रेडिट बॅलन्स

(४) राज्य सरकार, आरबीआय, आयडीबीआय, एक्झिम बँक, नाबार्ड, एसआयडीबीआय, एनएचबी, रिकन्स्ट्रक्शन बँक , नॅशनल को.ऑप.डेवलपमेंट कॉर्पोरेशन ह्यांच्या कडील कर्जे किंवा संबंधित राज्याच्या राज्य सहकारी बँक किंवा संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा केंद्रीय सहकारी बँक ह्यांच्याकडून घेतलेल्या अग्रिम राशी तसेच मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजच्या विरुध्द घेतलेली अग्रिम राशी किंवा कर्ज व्यवस्था.

**(४) निव्वळ जबाबदा-या (लायाबिलिटीज)**

सीआरआर व एसएलआरसाठी जबाबदा-या  काढताना, त्या बँकेच्या भारतातील इतर बँकांबाबत असलेल्या बँकिंग सिस्टिम मधील निव्वळ जबाबदा-या हिशेबात घेतल्या जातील.  म्हणजे, बँकिंग सिस्टिम मधील इतर बँकांमधील भारतातील ॲसेट्स, बँकिंग सिस्टिम ला असलेल्या एकूण जबाबदा-यांमधून वजा/कमी केल्या जातील.

**(५) लायाबिलिटी टु बँकिंग सिस्टिम मध्ये पुढील गोष्टी समाविष्ट आहेत**

(१) त्या बँकांच्या ठेवी

(२) बँकांकडून घेतलेला पैसा (कॉल मनी/नोटिस डिपॉझिट्स)

(३) बँकांबाबतच्या जबाबदा-यांच्या इतर संकीर्ण बाबी, जसे, बँकांना दिलेली पार्टिसिपेशन प्रमाणपत्रे, बँक  ठेवींवर उपार्जित झालेले व्याज इत्यादि.

**(६) बँकिंग सिस्टिम वरील जबाबदा-यांचे वर्गीकरण**

(१) बँकेच्या, बँकिंग सिस्टिम बाबतच्या जबाबदा-यांचे स्थूलमानाने दोन वर्गात वर्गीकरण करण्यात आले आहे - डिमांड लायाबिलिटीज व टाईम लायाबिलिटीज

(२) बँकिंग सिस्टिम च्या डिमांड लायाबिलिटीज खालील प्रमाणे वर्गीकृत केल्या गेल्या आहेत.

(अ) युसीबींमधील चालु खात्यात पुढील संस्थांच्या शिल्लक रकमा

* एसबीआय

* एसबीआयच्या दुय्यम बँका

* राष्ट्रीयीकृत बँका

(ब) पुढील प्रकारच्या डिमांड लायाबिलिटीज

(१) युसीबी मधील चालु खात्यात पुढील संस्थांनी ठेवलेल्या शिल्लक रकमा

* आरआरबी बँकिंग कंपन्या - म्हणजे खाजगी क्षेत्रातील बँका व विदेशी बँका

* सहकारी बँका

* इतर अधिसूचित वित्तसंस्था

(२) वरील बँकांच्या मुदतबाह्य (ओव्हरड्यु) टाईम डिपॉझिट्सच्या शिल्लक रकमा

(३) बँकांना दिलेली मागणी केल्यावर देय असलेली पार्टिसिपेशन प्रमाणपत्रे

(४) बँकांच्या ठेवींवर उपार्जित झालेले व्याज (आरआरबी) *

(५) बँकांकडून कॉल मनी स्वरुपात घेतलेले पैसे

बँकिंग सिस्टिम च्या व्याख्येमध्ये

(३) बँकिंग सिस्टिम ला असलेल्या टाईम लायाबिलिटीजमध्ये पुढील बाबी समाविष्ट आहेत

(अ) बँकांकडील सर्व प्रकारच्या ठेवी

(ब) बँकांकडील ठेव प्रमाणपत्रे

(क) मागणी केल्यावर देय नसणारी बँकांना दिलेली पार्टिसिपेशन प्रमाणपत्रे

(ड) बँकांच्या * टाईम डिपॉझिट/सीडींवर उपार्जित झालेले व्याज

बँकिंग सिस्टिम च्या व्याख्येमध्ये

* ठेवींवर उपार्जित झालेल्या व्याजाच्या रकमेपासून ही रक्कम वर्गीकृत/वेगळी करता येणे शक्य नाही. उपार्जित झालेले एकूण व्याज, इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज मध्ये दाखविता येईल.

**(७) बँकिंग सिस्टिम जवळील ॲसेट्स**

(१) बँकिंग सिस्टिम कडील चालु खात्यामधील शिल्लक

(२) बँकिंग सिस्टिम मध्ये असलेल्या बँका व अधिसूचित संस्थांमधील इतर खात्यांमधील शिल्लक

(३) बँकिंग सिस्टिममधील बँका व अधिसूचित वित्त संस्थांना, १४ दिवसांपर्यंत कर्जाऊ दिलेला मनी ॲट कॉल व शॉर्ट नोटिस

(४) बँकिंग सिस्टिम ला उपलब्ध केलेली (मनी ॲट कॉल व शॉर्ट नोटिस सोडून) कर्जे

(५) बँकिंग सिस्टिम कडून येणे असलेल्या अन्य रकमा जसे, आंतर बँकीय प्रेषण सुविधेखाली, बँकेच्या इतर बँकांमध्ये (ट्रान्झिट किंवा इतर खात्यात) असलेली रक्कम.

(८) (१) बँकांनी टर्म मनी मार्केटमधील पुढील वित्तसंस्थांना दिलेली कर्जे ही बँकिंग सिस्टिम मधील ॲसेट्स म्हणून धरली जाणार नाहीत. ह्यासाठी, ही कर्जे, बँकिंग सिस्टिम ला असलेल्या जबाबदा-यांविरुध्द नेट-ऑफ केली जाऊ नयेत.

*एक्झिम बँक

*नाबार्ड

*आयएफसीआय

*आयआयबीआय

*एसआयडीबीआय

(२) ह्या वित्तसंस्थांकडून, पुनर्वित सोडून अन्य कर्जे ही लायाबिलिटी टु अदर्सचा एक भाग असू नये आणि ह्यासाठी, राखीव निधीच्या आवश्यकतांसाठी तो निव्वळ डिमांड व टाईम लायाबिलिटीजचा भाग असावा

**(९) लायाबिलिटीज खालील विशिष्ट बाबींचे वर्गीकरण**

खरेदी केलेल्या/डिसकाऊंट केलेल्या बिलांवरील मार्जिन मनी हा बाह्य जबाबदा-या म्हणून समजताना बँकांनी एकसमान कार्यरीत ठेवावी आणि राखीव निधीच्या आवश्यकता ठेवण्यासाठी, त्यात इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज समाविष्ट कराव्यात.

**(i) आंतर-शाखीय खाती**

(अ) आंतर-शाखीय खात्यामध्ये असलेली निव्वळ शिल्लक (नेट बॅलन्स), क्रेडिटमध्ये असल्यास, ती शिल्लक, सीआरआर व एसएलआर साठीच्या एकूण डिमांड व टाईम लायाबिलिटीजमध्ये समाविष्ट केलेल्या, अन्य जबाबदा-या व तरतुदी खाली दाखविल्या जाव्यात.

(ब) २७.०७.९८ नंतर, बँकांनी, आंतर शाखीय खात्यामध्ये पाच वर्षापेक्षा अधिक काळासाठी आऊटस्टँडिंग असलेल्या क्रेडिट नोंदी, ब्लॉक्ड अकाऊंट म्हणून वेगळ्या कराव्यात आणि त्या, इतर जबाबदा-या व तरतुदी खालील, इतर खाली दर्शवाव्यात. त्यानंतर, क्रेडिटमध्ये असल्यास, इतर जबाबदा-या व तरतुदी खाली किंवा डेबिट असल्यास इतर ॲसेट्स खाली समाविष्ट करण्यासाठी, आंतर शाखीय व्यवहारांची निव्वळ रक्कम काढतेवेळी, ब्लॉक्ड अकाऊंट ची एकूण रक्कम वगळण्यात यावी आणि केवळ शेष क्रेडिट नोंदी म्हणून असलेली रक्कमेचे डेबिट नोंदी

बरोबर नेटिंग करावे.  अशा रितीने, आंतर शाखीय नोंदींची नेट रक्कम ही एक डेबिट शिल्लक असली तरीही, ब्लॉक्ड अकाऊंट मधील शिल्लक, सीआरआर व एसएलआर काढण्यासाठी हिशेबात धरली जाईल.

**(ii) डिसकाऊंट/खरेदी केलेल्या बिलांवरील मार्जिन मनी**

खरेदी केलेल्या/डिसकाऊंट केलेल्या बिलांवरील मार्जिन मनी हा बाह्य जबाबदा-या म्हणून समजताना बँकांनी एकसमान कार्यरीत ठेवावी आणि राखीव निधीच्या आवश्यकता ठेवण्यासाठी, त्यात इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज समाविष्ट करावे.

(iii) ठेवींवरील उपार्जित व्याज

(अ) सर्व ठेवी खात्यांवर (बचत, स्थिर, आवर्ती, रोख प्रमाणपत्रे, पुनर्गुंतवणुक योजना इ.) उपार्जित झालेले व्याज हे, सीआरआर व एसएलआर ठेवण्यासाठी, बँकांनी त्यांची एक जबाबदारी (लायाबिलिटी) म्हणून समजावे - मग उपार्जित व्याज प्रत्यक्षात देय झाले असो किंवा ठेवी परत करण्यासाठी ठरलेल्या तारखेपर्यंत ते देय नसो.

(ब) ठेवींवर उपार्जित झालेले व्याज, फॉर्म १ व ८ मध्ये इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज खाली वर्गीकृत केले जावे.

**(१०) सीआरआर व एसएलआरसाठी बाह्य जबाबदा-या म्हणून न समजण्याची रक्कम**

(१) संबंधित अग्रिम राशींबाबत तडजोड प्रलंबित आहे अशा, आवाहित केलेल्या हमीमधील, डीआयसीजीसी कडील दाव्यांच्या रकमा.

(२) कोर्ट रिसीव्हरकडून मिळालेल्या रकमा

(३) कोर्टाचा निर्णय प्रलंबित असताना विमा कंपनीकडून दाव्यांची तात्पुरती तडजोड म्हणून मिळालेल्या रकमा

(४) संबंधित अग्रिम राशींविरुध्द सेट-ऑफ करणे प्रलंबित असलेल्या, हमी आवाहित केल्यावर ईसीजीसीकडून मिळालेल्या रकमा